# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२५/M/०००७५३**

**अपिलार्थी डॉ. संजय निळकंठराव लाखेपाटील**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
मा.राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय, प्रशासन विभाग,
राजभवन, मलबार हिल, मुंबई- ४०० ०३५

**प्रथम अपिलीय अधिकारी**
मा.राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय, प्रशासन विभाग,
राजभवन, मलबार हिल, मुंबई- ४०० ०३५

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०५.२०२६</u>**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.१२.२०२४ | - | २२.०१.२०२५ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २५.०३.२०२५ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

२. अपिलार्थींनी दि. १०.१२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार मा. मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री मा. एकनाथ शिंदे, मा. अजित पवार यांच्या सरकार स्थापना आणि शपथविधी संबंधीत सर्व कागदपत्रे मिळणे बाबत. - १) सरकार स्थापनेचा दावा करणारी सर्व कागदपत्रे, २) महामहिम राज्यपाल यांनी सत्ता स्थापन करण्यासाठी दिलेले निमंत्रण. ३) शपथविधी घेण्यासाठी दिलेल्या निमंत्रणाची प्रत. ४)शपथविधी घेण्यासाठीची सर्व कागदपत्रे मुळ नस्ती पान मिळणे बाबत. अ) महामहिम राज्यपालाच्या वतीने शपथविधी कार्यक्रम देणारे अधिकारी व त्यांचे पदनाम. ब) शपथविधी संचलन करित असतांना ते वाचत असलेली कार्यक्रम पत्रिका आणि शपथपत्र मजकूर पत्राच्या सर्व प्रती. क) मा. मुख्यमंत्री आणि मा.उपमुख्यमंत्री यानी शपथ घेताना वाचन केलेल्या शपथपत्राच्या प्रती. ड) शपथ घेतल्यानंतर सहयांच्या रजिस्टरमधील सहया केलेली पाने आणि इतर सर्व शपथविधी कार्यक्रमसंबंधीत सर्व आवश्यक कागदपत्रे, नस्ती यांच्या सत्यप्रती. ५) शपथविधी नंतर काढलेले शासकीय नोटीफिकेशन्स /शासनादेश अशी माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. २२.०१.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, कार्यालयातील उपलब्ध अभिलेखावरुन असे निदर्शनास

..२/-

येते की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

पुढील सुनावणीस तत्कालीन जन माहिती अधिकारी व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १४.०५.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०४.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई